॥ श्री नवनाथभक्तिसार ॥

Shri Navnath Bhaktisar

ADHYAYA 11 --- EKADASHADHYAYA

श्रीगणेशाय नमः । श्रीगुरुभ्यो नमः । श्रीपांडुरंगाय नमः । श्रीकुलदेवतायै नमः । श्रीमातापितृभ्यां नमः ।

Shri Ganeshaaya Namah | Shri Gurubhyo Namah | Shri Paandurangaaya Namah | Shri Kuladevataayai Namah | Shri Maataa pitribhyaam Namah |

Summary

Arriving at the sacred heights of Badrikashrama, Machindranath and Goraksha offer a powerful prayer to Lord Shiva, who manifests in person to praise the young disciple's divine destiny. Echoing the gods' earlier warning, Shiva emphasizes that without the tempering fire of penance, Goraksha's vast scriptural knowledge will remain completely unfulfilled. Dismissing Machindranath's concerns about the boy's tender age, Shiva promises his personal protection and sets the young disciple into a state of severe austerity, standing on a single toe upon an iron spike. Assured of his disciple's safety, Machindranath departs on a twelve-year pilgrimage across the holy lands, eventually arriving at Setubandha where Lord Hanuman eagerly awaits him. Holding the master to a previous promise, Hanuman guides Machindranath into the fabled Female Kingdom (Stri Rajya), where the master is wedded to Queen Mainakini and fathers a son named Meennath. Meanwhile, in the distant kingdom of Hastinapur, a miraculous birth occurs when a radiant infant—the incarnate soul of Antariksha Narayan—is discovered unharmed within a royal sacrificial fire-pit. Adopted by King Brihadrava and named Jalandhar, the prince grows rapidly but becomes utterly revolted by the concept of worldly marriage and flees into the wilderness. Deep within a mountain ravine, a raging forest fire approaches the sleeping youth, only to transform into the fire god Agni, who gently awakens Jalandhar to reveal his true celestial parentage.

Ovee 1

जयजयाजी इंदुशलाका । मुगुटमणे सकळटिळका । इंदिरापते विबुधजनका । भक्तिमानसा विराजित ॥ १ ॥

Transliteration

Jayajayaajee Indu-shalaakaa | Mugutamane sakala-tilakaa | Indiraa-pate vibudha-janakaa | Bhakti-maanasaa viraajitu ||

Ovee 2

ऐसा धैर्यऔदार्यवंत । पुढे बोलवी भक्तिसार ग्रंथ । मागिले अध्यायी गहनीनाथ । जन्मोदय पावला ॥ २ ॥

Transliteration

Aisaa dhairya-audaarya-vantu | Pudhe bolavee Bhaktisaara granthu | Maagile adhyaayee Gahanee-Naathu | Janmodaya paavalaa ||

Ovee 3

यावरी गोरक्ष मच्छिंद्रनाथ । महींची तीर्थें करीत । हिमाचल बद्रिकेदारात । भ्रमण करीत पैं गेले ॥ ३ ॥

Transliteration

Yaavaree Goraksha Machchindra-Naathu | Maheenchee teerthe kareetu | Himaachala Badri-Kedaaraatu | Bhramana kareeta pai gele ||

Ovee 4

इतुकी कथा सिंहावलोकनीं । पूर्वाध्यायांत कीजे श्रवणी । असो गुरुशिष्य बद्रिकाश्रमीं । शिवालया पातले ॥ ४ ॥

Transliteration

Itukee kathaa sinha-avalokanee | Poorva-adhyaayaanta keeje shravanee | Aso guru-shishya Badrikaa-ashramee | Shiva-aalayaa paatale ||

Ovee 5

बद्धांजळी जोडोनि कर । करिते झाले नमस्कार । नमस्कार करुनि जयजयकार । स्तुतिसंवादें आराधिलें ॥ ५ ॥

Transliteration

Baddha-anjalee jodoni karu | Karite jhaale namaskaaru | Namaskaara karuni jaya-jaya-kaaru | Stuti-samvaade aaraadhile ||

Ovee 6

हे त्रिपुरारी शूळपाणी । अपर्णावर पंचाननी । रंडमाळा चिताभस्मी । दिव्यतेजभूषित तूं ॥ ६ ॥

Transliteration

Hey Tripuraaree Shoola-paanee | Aparnaa-vara pancha-aananee | Runda-maalaa chitaa-bhasmee | Divya-teja-bhooshita too ||

Ovee 7

हे कामांतका दक्षतेजा । भोळवट वरां देसी दानवां । कैलासपते महादेवा । सदाशिवा आदिमूर्ते ॥ ७ ॥

Transliteration

Hey Kaama-antakaa Daksha-tejaa | Bholavata varaa desee daanavaa | Kailaasa-pate Mahaadevaa | Sadaashivaa Aadi-moorte ||

Ovee 8

हे दिगंबरा जगजेठीं । भाळीं गंगा मौळीं जटाजूटी । नरकपाळ करसंपुटीं । इंदुकळेतें मिरविशी ॥ ८ ॥

Transliteration

Hey Digambaraa jaga-jethee | Bhaalee Gangaa maulee jataa-jootee | Naraka-paala kara-samputee | Indu-kalete miravishee ||

Ovee 9

उरगवेष्टन कुरंगसाली । व्याघ्रांबर वसनपाली । गजचर्मादि मिति झाली । परिधाना महाराजा ॥ ९ ॥

Transliteration

Uraga-veshtana kuranga-saalee | Vyaaghra-ambara vasana-paalee | Gaja-charmaadi miti jhaalee | Paridhaanaa Mahaaraajaa ||

Ovee 10

हे कैलासवासा उमापती । दक्षजामाता आदिमूर्ती । चक्रचालका मायाभगवती । आम्हां दासा अससी तूं ॥ १० ॥

Transliteration

Hey Kailaasa-vaasaa Umaa-patee | Daksha-jaamaataa Aadi-moortee | Chakra-chaalakaa maaya-Bhagavatee | Aamhaa daasaa asasee too ||

Ovee 11

हे नीलग्रीवा आदिपीठ । करुणकरा उत्तमा श्रेष्ठ । स्वीकारुनि सर्व अरिष्ट । सुख देसी देवांसी ॥ ११ ॥

Transliteration

Hey Neela-greevaa aadi-peethu | Karuna-karaa uttamaa shreshthu | Sveekaaruni sarva arishtu | Sukha desee devaansee ||

Ovee 12

हे भाळदृष्टीत्रयार्थनयनी । डमरु त्रिशूळ विराजे पाणीं । सदा प्रिय वृषभ वाहनीं । भस्मधारणी महाराजा ॥ १२ ॥

Transliteration

Hey bhaala-drishtee-trayaartha-nayanee | Damaru trishoola viraaje paanee | Sadaa priya vrishabha vaahanee | Bhasma-dhaaranee Mahaaraajaa ||

Ovee 13

हे स्मशानवासी वैराग्यशीळा । नगजामात रक्षपाळा । श्वेतवर्णा तमोगुणा आगळा । वाहसी गळां राममंत्र ॥ १३ ॥

Transliteration

Hey smashaana-vaasee vairaagya-sheelaa | Naga-jaamaata raksha-paalaa | Shveta-varnaa tamo-gunaa aagalaa | Vaahasee galaa Raama-mantru ||

Ovee 14

हे सर्वाधीश विश्वपती । भिक्षाटणीं बहुत प्रीती । जटा पिंगटा त्रिपुंड्र लल्लाटीं । शुद्ध वीरगुंठी शोभतसे ॥ १४ ॥

Transliteration

Hey sarva-adheesha vishva-patee | Bhikshaa-atanee bahuta preetee | Jataa pingataa tripundra lallaatee | Shuddha veera-gunthee shobhatase ||

Ovee 15

फरशांकुश डमरु हातीं । लोप पापा पातोपातीं । षडाननताता सुत गणपती । विद्यालक्षणीं मिरविसी ॥ १५ ॥

Transliteration

Pharasha-ankusha damaru haatee | Lopa paapaa paato-paatee | Shadaanana-taataa suta Ganapatee | Vidyaa-lakshanee miravisee ||

Ovee 16

ऐसी स्तुति अपार वचनीं । करीर मच्छिंद्र बद्रिकाश्रमीं । स्तुति ऐकूनि प्रेमें उगमी । प्रगट झाला महाराज ॥ १६ ॥

Transliteration

Aisee stuti apaara vachanee | Karita Machchindra Badrikaa-ashramee | Stuti aikuni preme ugamee | Pragata jhaalaa Mahaaraajaa ||

Ovee 17

मग मच्छिंद्राचा धरुनि हस्त । सप्रेम त्यातें आलिंगित । निकट बैसवूनि पुसे त्यातें । योगक्षेम कैसा तो ॥ १७ ॥

Transliteration

Maga Machchindra-achaa dharuni hastu | Saprema tyaate aalingitu | Nikata baisavuni puse tyaate | Yogakshema kaisaa toh ||

Ovee 18

गोरक्षातें घेऊनि जवळी । मुख स्वकरें कुरवाळी । म्हणे बा उदय येणें कालीं । हरिनारायण झालासी ॥ १८ ॥

Transliteration

Gorakshaate ghevuni javalee | Mukha svakare kuravaalee | Mhane baa udaya yene kaalee | Hari-Naaraayana jhaalaasee ||

Ovee 19

ऐसें वदोनी आणिक वदत । हे महाराज मच्छिंद्रनाथ । हा तव शिवयोगें सुत । तारक होईल ब्रह्मांडा ॥ १९ ॥

Transliteration

Aise vadonee aanika vadatu | Hey Mahaaraaja Machchindra-Naathu | Haa tava Shiva-yoge sutu | Taaraka hoeela brahmaandaa ||

Ovee 20

म्यां पूर्वीच यातें पाहिलें होतें । म्हणशील तरी कनकगिरीतें । तुवां अभ्यासूनि सुतें । आणिल दैवत घरातें ॥ २० ॥

Transliteration

Myaa poorveecha yaate paahile hote | Mhanasheela taree Kanaka-Gireete | Tuvaa abhyaasuni sute | Aanila daivata gharaate ||

Ovee 21

श्रीराम नरसिंह सूर्य हनुमंत । भैरव कालिका वीरांसहित । पाचारितां मीही तेथ । आलों होतों महाराजा ॥ २१ ॥

Transliteration

Shree-Raama Narasimha Soorya Hanumantu | Bhairava Kaalikaa veeraan-sahitu | Paachaaritaa meehee tethu | Aalo hoto Mahaaraajaa ||

Ovee 22

तस्मात् पूर्वीची होय ओळखी । म्हणवूनि गोरक्ष घेतला अंकीं । परी आतां असो शेखी । एक वचन ऐकिजे ॥ २२ ॥

Transliteration

Tasmaatu poorveechee hoya olakhee | Mhanavuni Goraksha ghetalaa ankee | Paree aataa aso shekhee | Eka vachana aikije ||

Ovee 23

यातें विद्येतें अभ्यासिलें । परी तपाविण विगलित ठेलें । जैसें शत्रु जगत्रयीं झाले । मग तें हिनत्व प्रतापा ॥ २३ ॥

Transliteration

Yaate vidyete abhyaasile | Paree tapaavina vigalita thele | Jaise shatru jagatrayee jhaale | Maga tey hinatva prataapaa ||

Ovee 24

कीं जीवनाविण वृक्ष जैसा । काळरुप भासे तैसा । कीं तरुविण ग्राम जैसा । बुभुक्षित लागतसे ॥ २४ ॥

Transliteration

Kee jeevanaa-vina vriksha jaisaa | Kaala-rupa bhaase taisaa | Kee taru-vina graama jaisaa | Bubhukshita laagatase ||

Ovee 25

कीं नाकेंविण सुंदर नारी । कीं विनातोय सरितापात्रीं । कीं नक्षत्राविण शोभा रात्रीं । कदाकाळी दिसेना ॥ २५ ॥

Transliteration

Kee naakevina sundara naaree | Kee vinaa-toya saritaa-paatree | Kee nakshatraa-vina shobhaa raatree | Kadaa-kaalee disenaa ||

Ovee 26

तरी तपाविण लखलखीत । विद्याभांडार न दिसत । जैसा मानव परम क्षुधित । विकळ शरीरीं मिरवतसे ॥ २६ ॥

Transliteration

Taree tapaavina lakhalaka-heetu | Vidyaa-bhaandaara na disatu | Jaisaa maanava parama kshudhitu | Vikala shareeree miravatase ||

Ovee 27

तरी आतां माझिया आश्रमीं । तपा बैसवीं योगद्रुमी । मग तपबळानें बलाढ्यगामी । विद्याअस्त्रें मिरवेल हा ॥ २७ ॥

Transliteration

Taree aataa maajhiyaa ashramee | Tapaa baisavee yoga-drumee | Maga tapa-balaane balaadhya-gaamee | Vidyaa-astre miravela haa ||

Ovee 28

याउपरीं मच्छिंद्रनाथ बोलत । वय धाकुटें बाळ अत्यंत । परी तप तीव्रक्लेशांत । साहिलें जाईल कैसें जी ॥ २८ ॥

Transliteration

Yaauparee Machchindra-Naatha bolatu | Vaya dhaakute baala atyantu | Paree tapa teevra-kleshaantu | Saahile jaaeela kaise jee ||

Ovee 29

येरु म्हणे वरदपाणी । तुझ्या आहे मौळिस्थानीं । तरी तपक्लेशावर कडसणी । दुःख देणार नाहीं बा ॥ २९ ॥

Transliteration

Yeru mhane Varada-paanee | Tujhyaa aahe mauli-sthaanee | Taree tapa-kleshaavara kadasanee | Duhkha denaara naahee baa ||

Ovee 30

यापरी येथें नित्यनित्य । मी समाचारीनें गोरक्षातें । तूं निःसंशय सकलातें । तपा गोरक्षा बैसवीं ॥ ३० ॥

Transliteration

Yaaparee yethe nitya-nityu | Mee samaachaareene Gorakshaate | Too nihsamshaya sakalaate | Tapaa Gorakshaa baisavee ||

Ovee 31

ऐसें वदतां आदिनाथ । अवश्य मच्छिंद्रनंदन म्हणत । उत्तम आहे ऐसें बोलत । अंगिकारिता पैं झाला ॥ ३१ ॥

Transliteration

Aise vadataa Aadinaathu | Avashya Machchindra-nandana mhanatu | Uttama aahe aise bolatu | Angikaaritaa pai jhaalaa ||

Ovee 32

तेथें आमुचें काय हरलें । कीं जन्मांधा चक्षू आले । कीं सदैव हरिणीतें सांभाळिले । एकटपणीं पावसांत ॥ ३२ ॥

Transliteration

Tethe aamuche kaaya harale | Kee janma-andhaa chakshoo aale | Kee sadaiva harineete saambhaalile | Ekata-panee paavasaantu ||

Ovee 33

तेवीं तूं आणि तुझा दास । येथें आश्रमीं करितां वास । तेथे वाईट काय आम्हांस । चिंता माझी निरसेल ॥ ३३ ॥

Transliteration

Tevee too aani tujhaa daasu | Yethe aashramee karitaa vaasu | Tethe vaaeta kaaya aamhaansu | Chintaa maajhee niraselu ||

Ovee 34

ऐसी शिवातें बोलूनि वाणी । परी हर्ष न माये मच्छिंद्रमनीं । जें योजिलें होते अंतःकरणीं । तेचि घडूनि पैं आले ॥ ३४ ॥

Transliteration

Aisee Shivaate boluni vaanee | Paree harsha na maaye Machchindra-manee | Je yojile hote antah-karanee | Techi ghaduni pai aale ||

Ovee 35

फारचि उत्तमोत्तम झालें । गोरक्षासी शिवें अंगिकारिलें । आतां जाईल संगोपिलें । अर्थअर्थी बहुवसें ॥ ३५ ॥

Transliteration

Phaarachi uttamottama jhaale | Gorakshaasee Shive angikaarile | Aataa jaaeela sangopile | Artha-arthee bahuvase ||

Ovee 36

मग उत्तम वेळा उत्तम दिवस । ग्रहबळ जाणूनि नक्षत्रास । उत्तम तिथी उत्तम मास । पाहूनि तपा बैसविला ॥ ३६ ॥

Transliteration

Maga uttama velaa uttama divasu | Graha-bala januni nakshatraasu | Uttama tithee uttama maasu | Paahuuni tapaa baisavilaa ||

Ovee 37

लोहाचा करुनि कंटक नीट । त्या अग्रीं योजूनि चरणांगुष्ठ । वामपादा देऊनि कष्ट । उभा राहिला गोरक्ष तो ॥ ३७ ॥

Transliteration

Lohaachaa karuni kantaka neetu | Tyaa agree yojuni charana-angushthu | Vaama-paadaa deuuni kashtu | Ubhaa raahilaa Goraksha toh ||

Ovee 38

वायुआहारीं ठेवूनि मन । क्षणिक अन्न त्यजून । उपरी फळपत्रीं आहार करुन । क्षुधाहरण करीतसे ॥ ३८ ॥

Transliteration

Vaayu-aahaaree thevuni manu | Kshanika anna tyajuunu | Uparee phala-patree aahaara karunu | Kshudhaa-harana kareetase ||

Ovee 39

सूर्यमंडळी ठेवूनि दृष्टी । तपो करितसे तपोजेठी । तें मच्छिंद्र पाहूनि निजदृष्टीं । परम चित्तीं तोषिला ॥ ३९ ॥

Transliteration

Soorya-mandalee thevuni drishtee | Tapo karitase tapo-jethee | Tey Machchindra paahuuni nija-drishtee | Parama chittee toshilaa ||

Ovee 40

मग आदिनाथा विनवोनी । मच्छिंद्र निघाला तीर्थाटनीं । द्वादश वर्षांचा नेम करुनी । गोरक्षातें सांगितलें ॥ ४० ॥

Transliteration

Maga aadi-Naathaa vinavonee | Machchindra nighaalaa teertha-atanee | Dvaadasha varshaanchaa nema karunee | Gorakshaate saangitale ||

Ovee 41

असो मच्छिंद्र गेला तीर्थाटनी । येरीकडे बद्रिकाश्रमीं । रात्रंदिवस बद्रिकाशूळपाणी । जवळी जाऊनि बैसला ॥ ४१ ॥

Transliteration

Aso Machchindra gelaa teertha-atanee | Yereekade Badrikaa-ashramee | Raatran-divasa Badrikaa-Shoola-paanee | Javalee jauni baisalaa ||

Ovee 42

वस्यें आपण आदिनाथ । गोरक्षाचें दास्य करीत । मागें पुढें राहुनि अत्यंत । आल्या विघ्ना निवटीतसे ॥ ४२ ॥

Transliteration

Vasye aapana Aadinaathu | Gorakshaache daasya kareetu | Maage pudhe raahuni atyantu | Aalyaa vighnaa nivateetase ||

Ovee 43

असो यावरी मच्छिंद्रनाथ । गया प्रयाग करुनि त्वरित । काशी अवंतिका मिथुळासहित । मथुरा काश्मिरी पाहिली ॥ ४३ ॥

Transliteration

Aso yaavaree Machchindra-Naathu | Gayaa Prayaaga karuni tvaritu | Kaashee Avantikaa Mithulaa-sahitu | Mathuraa Kaashmiree paahilee ||

Ovee 44

अयोध्या द्वारका महाकाळेश्वर । सोमनाथ करुनि तत्पर । ब्रह्मगिरी त्रंबकेश्वर । घृणेश्वर पाहिला ॥ ४४ ॥

Transliteration

Ayodhyaa Dvaarakaa Mahaa-Kaaleshvaru | Soma-Naatha karuni tatparu | Brahma-Giree Triambakeshvaru | Ghrineshvara paahilaa ||

Ovee 45

भीमा उगमीं भीमाशंकर । आंवढया नागनाथादि पंढरपूर । करुनि चौदा पीठें थोर । भगवतीची पाहिली ॥ ४५ ॥

Transliteration

Bheemaa ugamee Bheemaa-Shankaru | Aavadhyaa Naaga-Naathaadi Pandharapooru | Karuni Chaudaa Peethe thoru | Bhagavateechee paahilee ||

Ovee 46

कार्तिक शेषाद्रि मल्लिकार्जुन । सरितासरोवरी अपार स्नान । घडलें करितां महीतें गमन । लोटली वर्षे द्वादशादि ॥ ४६ ॥

Transliteration

Kaartika Sheshaadri Mallikaarjunu | Saritaa-sarovaree apaara snaanu | Ghadale karitaa maheete gamanu | Lotalee varshe dvaadashaadi ||

Ovee 47

सकळ तीर्थे महीचीं करुन । शेवटी सेतुबंधी जाऊन । रामेश्वराचे चरण वंदून । स्नाना गेला अब्धीसी ॥ ४७ ॥

Transliteration

Sakala teerthe maheechee karunu | Shevatee Setu-bandhee jaunu | Raameshvaraache charana vandunu | Snaanaa gelaa abdheesee ||

Ovee 48

तों श्वेतबंधी वायुसुत । जाऊनि नमी मच्छिंद्रनाथ । परी मच्छिंद्रा पाहतां मकरध्वजतात । आल्हादला चित्तीं बहुत तो ॥ ४८ ॥

Transliteration

Toh Setu-bandhee Vaayu-sutu | Jauni namee Machchindra-Naathu | Paree Machchindraa paahataa Makara-dhvaja-taatu | Aalhaadalaa chittee bahuta toh ||

Ovee 49

परमप्रीतीं लवडसवडी । मच्छिंद्रहस्त धरुनि ओढी । हृदयीं आलिंगूनि परम आवडीं । निकट बैसवी महाराजा ॥ ४९ ॥

Transliteration

Parama-preetee lavadasavadee | Machchindra-hasta dharuni odhee | Hridayee aalinguni parama aavadee | Nikata baisavee Mahaaraajaa ||

Ovee 50

म्हणे बा तूं योगद्रुमानें । कोणीकडे केले येणें । चोवीस वर्षी तुझें दर्शन । आजि झाले महाराजा ॥ ५० ॥

Transliteration

Mhane baa too yoga-drumaane | Koneekade kele yene | Choveesa varshee tujhe darshanu | Aaji jhaale Mahaaraajaa ||

Ovee 51

कीं आळशावरी गंगा वळली । कीं द्वादश वर्षे पर्वणी आली । तैसी माते गोष्ट जाहली । आज दर्शनें तुझ्या बा ॥ ५१ ॥

Transliteration

Kee aalashaavaree Gangaa valalee | Kee dvaadasha varshe parvanee aalee | Taisee maate goshta jaahalee | Aaja darshane tujhyaa baa ||

Ovee 52

ऐसें बोलूनि वायुसुत । परम मच्छिंद्राचें आतिथ्य करीत । मग समय पाहूनि संतोषयुक्त । मच्छिंद्रातें बोलतसे ॥ ५२ ॥

Transliteration

Aise boluni Vaayu-sutu | Parama Machchindraache aatithya kareetu | Maga samaya paahuuni santoshayuktu | Machchindraate bolatase ||

Ovee 53

आज चोवीस संवत्सर झाले । परी तुजकडे माझे चक्षु लागले । कैं भेटसील म्हणोनि भुकेले । पारणें फिटलें आजि तें ॥ ५३ ॥

Transliteration

Aaja choveesa samvatsara jhaale | Paree tujakade maajhe chakshu laagale | Kai bhetaseela mhanoni bhukele | Paarane phitale aaji tey ||

Ovee 54

हे महाराज योगद्रुमा । कामनीं वेधली जो आम्हां । त्या सरिताप्रवाहीं हस्तवर उगमा । बुडवितो मजलागीं ॥ ५४ ॥

Transliteration

Hey Mahaaraaja Yogadrumaa | Kaamanee vedhalee jo aamhaa | Tyaa saritaa-pravaahee hastavara ugamaa | Budavito majalaagee ||

Ovee 55

तरी त्या कामनाजळांत । तूं तारक झाला आहेसी मातें । झालासी परी अद्यापपर्यंत । बाहेर न काढिसी महाराजा ॥ ५५ ॥

Transliteration

Taree tyaa kaamanaa-jalaantu | Too taaraka jhaalaa aahesee maate | Jhaalaasee paree adyaapa-paryantu | Baahera na kaadhisee Mahaaraajaa ||

Ovee 56

पूर्वी मजला देऊनि वचन । तुवां केलें आहे गमन । परी स्त्रीराज्याचें स्थान । पाहिलें तुवां नाहीं कीं ॥ ५६ ॥

Transliteration

Poorvee majalaa deuni vachanu | Tuvaa kele aahe gamanu | Paree Stree-Raajyaache sthaanu | Paahile tuvaa naahee kee ||

Ovee 57

आतां तरी धरुनि चित्तीं । प्रसन्न करी कृपाभगवती । मैनाकिनीची कामरती । पूर्ण आहुति घेई कां ॥ ५७ ॥

Transliteration

Aataa taree dharuni chittee | Prasanna karee kripaa-Bhagavatee | Mainaakineechee kaama-ratee | Poorna aahuti gheyee kaa ||

Ovee 58

आपुले वचनेंकरुनि त्याचें । आणिक फल दे मम वचनाचें । मग पावूनि आर्त मनीचें । सुटका केव्हां होईल ॥ ५८ ॥

Transliteration

Aapule vachane-karuni tyaache | Aanika phala de mama vachanaache | Maga pavuni aarta maneeche | Sutakaa kevhaa hoeelu ||

Ovee 59

मी गुंतलों तिचे वचनीं । कीं मच्छिंद्र पाठविन ये भुवनीं । तरी ते रतिसुखाच्या कामाश्रमीं । मच्छिंद्रनाथा मिरविजे ॥ ५९ ॥

Transliteration

Mee guntalo tiche vachanee | Kee Machchindra paathavina ye bhuvanee | Taree tey rati-sukhaachyaa kaama-aashramee | Machchindra-Naathaa miravije ||

Ovee 60

ऐसें वचन तीतें व्यक्त । आहे तरी मज करा मुक्त । आणि तुवांही वचन दिधलें मातें । तेंही सत्य करीं आतां ॥ ६० ॥

Transliteration

Aise vachana teente vyaktu | Aahe taree maja karaa muktu | Aani tuvaanhee vachana didhale maate | Tehee satya karee aataa ||

Ovee 61

ऐसी ऐकूनि हनुमंतवाणी । अवश्य म्हणे मच्छिंद्रमुनी । मग त्रिरात्र तेथें वस्ती करुनी । निघते झाले उभयतां ॥ ६१ ॥

Transliteration

Aisee aikuni Hanumanta-vaanee | Avashya mhane Machchindra-munee | Maga tri-raatra tethe vastee karunee | Nighate jhaale ubhayataa ||

Ovee 62

मार्गी जातां अनेक तीर्थें । यथाविधि झाले सरिते । मग गौडबंगाला टाकूनि त्वरितें । स्त्रीराज्यांत संचरले ॥ ६२ ॥

Transliteration

Maargee jaataa aneka teerthe | Yathaavidhi jhaale sarite | Maga Gauda-Bangaalaa takuni tvarite | Stree-Raajyaanta sancharale ||

Ovee 63

तंव ती सकळ स्त्रियांची स्वामिनी । विराजलीसे राज्यासनीं । महापुण्यांशें तपोखाणी । मैनाकिनी ज्ञानकळा ॥ ६३ ॥

Transliteration

Tava tee sakala striyaanchee svaaminee | Viraajaleese raajya-aasanee | Mahaa-punyaanshe tapo-khaanee | Mainaakinee jnyaana-kalaa ||

Ovee 64

शृंगारमुरड उत्तमजन । तेथें भोगीतसे राज्यासन । गज वाजी उदधी रत्न । रथ उष्ट्रादि असती पैं ॥ ६४ ॥

Transliteration

Shringaara-murada uttama-janu | Tethe bhogeetase raajya-aasanu | Gaja vaajee udadhee ratnu | Ratha ushtraadi asatee pai ||

Ovee 65

छडीदार चोपदार । रत्नपारख हेमकार । राउतपूर्ण भांडार । पोतदार फरासी ॥ ६५ ॥

Transliteration

Chadee-daara chopa-daaru | Ratna-paarakha hemakaaru | Raauta-poorna bhaandaaru | Pota-daara pharaasee ||

Ovee 66

यंत्रधारी मंत्रधारी । नानामंत्री असती कुसरी । शास्त्रनिपुण कारभारी । लेखकही सेवा विराजले ॥ ६६ ॥

Transliteration

Yantra-dhaaree mantra-dhaaree | Naanaa-mantree asatee kusaree | Shaastra-nipuna kaarabhaaree | Lekhakahee sevaa viraajale ||

Ovee 67

जासुद हलकारे वकीलात । करुं जाणती सकळ समंतात । पायदळ अश्वराउत । नसे गणित पृतनेतें ॥ ६७ ॥

Transliteration

Jaasuda halakaare vakeelaatu | Karu jaanatee sakala samantaatu | Paaya-dala ashva-raautu | Nase ganita pritanete ||

Ovee 68

कुत्तेवान चित्तेवान । साकरखाणी पहिलवान । दिवाणादि कपिलखान । गजमस्तकीं रुढती ॥ ६८ ॥

Transliteration

Kutte-vaana chitte-vaanu | Saakara-khaanee pahilavaanu | Divaanaadi kapila-khaanu | Gaja-mastakee rudhatee ||

Ovee 69

खिस्मतगारी करणार । सिकारकी बंडीदार । ताशा मरफी पनवाळ थोर । कुशळपणीं वाजविती ॥ ६९ ॥

Transliteration

Khismata-gaaree karanaaru | Sikaarakee bandee-daaru | Taashaa maraphee panavaala thoru | Kushala-panee vaajavitee ||

Ovee 70

गायक हेर बातमीदार । खेळक प्राज्ञी निपुणतर । वाद्यधारी शृंगारकर । शिंपी कुल्लाल विराजले ॥ ७० ॥

Transliteration

Gaayaka hera baatamee-daaru | Khelaka praajnyee nipuna-taru | Vaadya-dhaaree shringaara-karu | Shimpee kullaala viraajale ||

Ovee 71

असो ऐसीं राजकारणें । बहुत असती कामें भिन्नें । परी सकळ समुदायकानें । स्त्रिया अवघ्या मिरवल्या ॥ ७१ ॥

Transliteration

Aso aisee raaja-kaarane | Bahuta asatee kaame bhinne | Paree sakala samudaaya-kaane | Striyaa avaghyaa miravalyaa ||

Ovee 72

असो अवघ्या कटकांत । संचरते झाले उभयतां नगरांत । राजद्वारीं जाऊनि त्वरित । झाले दृष्टीस रायासी ॥ ७२ ॥

Transliteration

Aso avaghyaa katakaantu | Sancharate jhaale ubhayataa nagaraantu | Raaja-dvaaree jauni tvaritu | Jhaale drishteesa raayaasee ||

Ovee 73

दृष्टीं पाहतांच अंजनीसुत । स्त्रियांसी आनंद झाला बहुत । बोलावूनि त्वरितात्वरित । कनकासनीं बैसविलें ॥ ७३ ॥

Transliteration

Drishtee paahataancha Anjanee-sutu | Striyaansee aananda jhaalaa bahutu | Bolaavuni tvaritaa-tvaritu | Kanaka-aasanee baisavile ||

Ovee 74

एकासनीं मच्छिंद्रनाथ । एकासनी अंजनीसुत । षोडशोपचारीं पूजूनि त्वरित । बद्धांजली केली तैं ॥ ७४ ॥

Transliteration

Eka-aasanee Machchindra-Naathu | Eka-aasanee Anjanee-sutu | Shodasha-upachaaree poojuni tvaritu | Baddha-anjalee kelee tai ||

Ovee 75

म्हणे महाराजा दिव्यरथा । वातनंदना अंजनीसुता । द्वितीय कोण सांग आतां । आगमन झालें महाराजा ॥ ७५ ॥

Transliteration

Mhane Mahaaraajaa divya-rathaa | Vaata-nandanaa Anjanee-sutaa | Dviteeya kona saanga aataa | Aagamana jhaale Mahaaraajaa ||

Ovee 76

येरु म्हणे वो शुभाननी । त्वां बैसूनि तपा प्राज्ञी । तरी त्या तपाच्या कामना मनीं । पूर्ण करीं आतां वो ॥ ७६ ॥

Transliteration

Yeru mhane vo shubha-aananee | Tvaa baisuni tapaa praajnyee | Taree tyaa tapaachyaa kaamanaa manee | Poorna karee aataa vo ||

Ovee 77

मम भक्तीचे वरदावळीं । कीं पुरुष लाधशील मच्छिंद्र बळी । तरी तोचि हा होय येणें काळीं । रतिसुखा निववावें ॥ ७७ ॥

Transliteration

Mama bhakteeche varada-aavalee | Kee purusha laadhasheela Machchindra balee | Taree tochi haa hoya yene kaalee | Rati-sukhaa nivavaave ||

Ovee 78

कीं सेवेलागीं उडुगणनाथ । कीं अरुणासह पूर्ण आदित्य । तेवीं तूंतें मच्छिंद्रनाथ । काम व्यक्त पुरवावया ॥ ७८ ॥

Transliteration

Kee seve-laagee Udugagana-Naathu | Kee arunaasaha poorna Aadityu | Tevee toote Machchindra-Naathu | Kaama vyakta puravaavayaa ||

Ovee 79

कीं शचीलागीं सहस्त्रनयनी । कीं शोभला जैसा शिव अपर्णी । तेवीं तूतें मच्छिंद्रमुनी । रतिसुखा हेलावे ॥ ७९ ॥

Transliteration

Kee Shachee-laagee sahastra-nayanee | Kee shobhalaa jaisaa Shiva Aparnee | Tevee toote Machchindra-munee | Rati-sukhaa helaave ||

Ovee 80

ऐसें बोलोनि वज्रशरीरी । निवांत बैसला आसनावरी । मग राहूनि तेथें तीन रात्री । निघता झाला कपिराज ॥ ८० ॥

Transliteration

Aise boloni Vajra-shareeree | Nivaanta baisalaa aasanaa-varee | Maga rahuni tethe teena raatree | Nighataa jhaalaa Kapi-raaja ||

Ovee 81

पुन्हां श्वेतपदा येऊनि । करीत बैसला श्रीरामचिंतन । येरीकडे मच्छिंद्रनंदन । सुखामाजी हेलावे ॥ ८१ ॥

Transliteration

Punhaa Seta-padaa yeunu | Kareeta baisalaa Shree-Raama-chintanu | Yereekade Machchindra-Nandanu | Sukhaa-maajee helaave ||

Ovee 82

बैसूनियां कनकासनीं । राज्याविलासा भोगी मुनी । मुक्तमाळा ग्रीवेलागुनी । हेलावती समोर ॥ ८२ ॥

Transliteration

Baisuniyaa Kanaka-aasanee | Raajya-vilaasaa bhogee Munee | Mukta-maalaa greeve-laagunee | Helaavatee samoru ||

Ovee 83

हेममुद्रिका ओपूनि कर्णीं । हस्त विराजले कनककोंदणी । भरजरी भूषणें हेमकर्णी । ढाळ देती लखलखीत ॥ ८३ ॥

Transliteration

Hema-mudrikaa opuni karnee | Hasta viraajale Kanaka-kondanee | Bharajaree bhooshane hema-karnee | Dhaala detee lakhalakheeta ||

Ovee 84

पुढें सेवे परिचारिका । परी त्याही दारा लावण्यलतिका । उर्वशीच्या सारुनि आवांका । सेवेलागीं उतरल्या ॥ ८४ ॥

Transliteration

Pudhe seve parichaarikaa | Paree tyaahee daaraa laavanya-latikaa | Urvasheechyaa saaruni aavaankaa | Seve-laagee utaralyaa ||

Ovee 85

बडीजाई बडीदार । वारंवार करिती पुकार । छडीदार चोपदार । दवलतजादा म्हणताती ॥ ८५ ॥

Transliteration

Badeejaaee badeedaaru | Vaaramvaara karitee pukaaru | Chadee-daara chopa-daaru | Davalatajaadaa mhanataatee ||

Ovee 86

मुक्तलवंगांचे तुरे माळी । कस्तुरी शोभे केशर भाळीं । राज्यासनीं स्त्रियामंडळी । सुशोभित भंवतालीं ॥ ८६ ॥

Transliteration

Mukta-lavangaanche ture maalee | Kasturee shobhe keshara bhaalee | Raajya-aasanee striyaa-mandalee | Sushobhita bhavataalee ||

Ovee 87

जैसा नभांत तारांगणीं । वेष्टित शोभला उडुगणस्वामी । तेवीं स्त्रियांत मच्छिंद्रमुनी । निजभारीं शोभला ॥ ८७ ॥

Transliteration

Jaisaa nabhaanta taaraa-anganee | Veshtita shobhalaa udugana-svaamee | Tevee striyaata Machchindra-Munee | Nija-bhaaree shobhalaa ||

Ovee 88

कीं देवगणीं शचीनाथ । परम शोभिवंत घवघवीत । तेवीं स्त्रीमंडळींत । मच्छिंद्रनाथ मिरवला ॥ ८८ ॥

Transliteration

Kee deva-ganee Shachee-Naathu | Parama shobhivanta ghavaghaveetu | Tevee stree-mandaleetu | Machchindra-Naatha miravalaa ||

Ovee 89

सदा बैसूनि एका आसनीं । खेळ खेळती द्यूतकर्मी । नाना विनोदून विनोदवाणी । हास्य करिती गदगदां ॥ ८९ ॥

Transliteration

Sadaa baisuni ekaa aasanee | Khela khelatee dyoota-karmee | Naanaa vinoduni vinoda-vaanee | Haasya karitee gadagadaa ||

Ovee 90

राज्यवैभवादि कारभार । स्वयें करिती सारासार । नानाकुशलता अपार । निजदृष्टीं पाहतसे ॥ ९० ॥

Transliteration

Raajya-vaibhavaadi kaarabhaaru | Svaye karitee saaraasaaru | Naanaa-kushalataa apaaru | Nija-drishtee paahatase ||

Ovee 91

रसायनीं कविताकार । वेदज्ञ बोलती शास्त्र अपार । ज्योतिष भविष्य जाणणार । व्याकरणादिक मिरवले ॥ ९१ ॥

Transliteration

Rasaayanee kavitaa-kaaru | Veda-jnya bolatee shaastra apaaru | Jyotisha bhavishya jaananaaru | Vyaakaranaadika miravale ||

Ovee 92

धनुर्धर युद्धशास्त्री प्रबळ । कीं भिन्न पाहती प्रळयकाळ । जळ तें निर्मील विशाळ । उभे असती सन्मुख ॥ ९२ ॥

Transliteration

Dhanurdhara yuddha-shaastree prabalu | Kee bhinna paahatee pralaya-kaalu | Jala tey nirmeela vishaalu | Ubhe asatee sanmukhu ||

Ovee 93

संगीतकार गायनप्रकारी । गंधर्वसरी तानमानी कळाकुसरी । औषधीक वैद्य रोगापरी । परीक्षिकी मीनले ते ॥ ९३ ॥

Transliteration

Sangeeta-kaara gaayana-prakaaree | Gandharva-saree taana-maanee kalaa-kusaree | Aushadheeka vaidya rogaaparee | Pareekshikee meenale tey ||

Ovee 94

अश्वारोहण उत्तमयुक्तीं । अश्व फिरवणें वाताकृती । कोकशास्त्र भाष्याकृती । स्वर्गाचाराचे सकळिक ॥ ९४ ॥

Transliteration

Ashva-aarohana uttama-yuktee | Ashva phiravane vaata-aakritee | Koka-Shaastra bhaashya-aakritee | Svarga-aachaaraache sakaliku ||

Ovee 95

नाटककळा सकळी शृंगारीत । आणूनि टेंकती राजसंमत । प्रसंगानुसार वाचे वदत । बोलूं जाण ती चातुरी ॥ ९५ ॥

Transliteration

Naataka-kalaa sakalee shringaareetu | Aanuni tenkatee raaja-sammatu | Prasanga-anusaara vaache vadatu | Boloo jaanatee chaaturee ||

Ovee 96

ऐसिया गुणांचे उत्तम भरत । हेलावती राजसभेत । तेणें चित्तसरितेंत । आनंदतोय हेलावे ॥ ९६ ॥

Transliteration

Aisiyaa gunaanche uttama bharatu | Helaavatee raaja-sabhetu | Tene chitta-saritetu | Aananda-toya helaave ||

Ovee 97

तेणेंकरुनि मच्छिंद्रनाथ । सुखाब्धीचा मीन तळपत । ऐसे लोटले दिवस बहुत । रतिसुखामाझारीं ॥ ९७ ॥

Transliteration

Tenekaruni Machchindra-Naathu | Sukha-abdheechaa meena talapatu | Aise lotale divasa bahutu | Rati-sukhaa-maajhaaree ||

Ovee 98

तों समयें चित्तसुखमेळीं । ऋतु पावली राजबाळी । ते कामरतीचे सुखवेळीं । गरोदर झाली ते दारा ॥ ९८ ॥

Transliteration

Toh samaye chitta-sukha-melee | Ritu paavalee raaja-baalee | Tey kaama-rateeche sukhavelee | Garodara jhaalee tey daaraa ||

Ovee 99

तो गणामाजी भद्रजाती । सर्वगुणी मुनी भद्रमूर्ती । अंशरुपें प्रगटूनि रती । देह धरिता पै झाला ॥ ९९ ॥

Transliteration

Toh ganaamaajee Bhadra-jaatee | Sarva-gunee Munee Bhadra-moortee | Ansha-rupe pragatuni ratee | Deha dharitaa pai jhaalaa ||

Ovee 100

रेतरक्त जेणें काळीं । लोटत मासां नवांचे मेळी । तदनंतर प्रसूत झालिया बाळी । बाळ बालार्क देखिला ॥ १०० ॥

Transliteration

Reta-rakta jene kaalee | Lotata maasaa navaanche melee | Tadanantara prasoota jhaaliyaa baalee | Baala baala-arka dekhilaa ||

Ovee 101

त्यातें भरतां द्वादश दिवस । उत्तमापरी केलें बारसें । नाम ठेविलें त्या देहास । मीननाथ म्हणवूनी ॥ १०१ ॥

Transliteration

Tyaate bharataa dvaadasha divasu | Uttamaa-paree kele baarase | Naama thevile tyaa dehaasu | Meena-Naatha mhanavuni ||

Ovee 102

याउपरी याचकां देऊनि दान । उचितार्थे सकळ तोषविले जन । नानारत्नीं देऊनि भूषण । गौरवातें मिरविलें ॥ १०२ ॥

Transliteration

Yaauparee yaachakaa deuuni daanu | Uchita-arthe sakala toshavile janu | Naanaa-ratnee deuni bhooshanu | Gauravaate miravile ||

Ovee 103

असो ऐसे संगोपनीं । तीन संवत्सर तया स्थानी । लोटूनि गेली सुखासनी । मच्छिंद्रातें भोगितां ॥ १०३ ॥

Transliteration

Aso aise sangopanee | Teena samvatsara tayaa sthaanee | Lotuni gelee sukha-aasanee | Machchindraate bhogitaa ||

Ovee 104

यावरी आतां दुसरे कथन । हस्तिनापुरीं कुरुनंदन । जनमेजयाच्या वंशाकारण । बृहद्रवा जन्मला ॥ १०४ ॥

Transliteration

Yaavaree aataa dusare kathanu | Hastinaa-puree Kuru-nandanu | Janamejayaachyaa vansha-kaaranu | Brihadravaa janmalaa ||

Ovee 105

तो जन्मेजयापासूनि पुढती । सातवा पुरुष वंशाप्रती । दोन सहस्त्र सातशतीं । कली गेलासे लोटूनी ॥ १०५ ॥

Transliteration

Toh Janmejayaa-paasuni pudhatee | Saatavaa purusha vamshaa-pratee | Dona sahastra saata-shatee | Kalee gelaase lotuni ||

Ovee 106

तो बृहद्रवा राजा थोर । राज्यपदी हस्तिनापूर । मेळवूनि महीचे अपार विप्र । सोमयाग मांडिला ॥ १०६ ॥

Transliteration

Toh Brihadravaa raajaa thoru | Raajya-padee Hastinaa-pooru | Melavuni maheeche apaara vipru | Soma-yaaga maandilaa ||

Ovee 107

एक वरुषें त्या क्षितीं । अग्निकुंडी पूर्णाहुती । पुष्ट होऊनि दाहकमूर्ती । तुष्ट शरीरी मिरवला ॥ १०७ ॥

Transliteration

Eka varushe tyaa kshitee | Agni-kundee poorna-aahutee | Pushta houni daahaka-moortee | Tushta shareeree miravalaa ||

Ovee 108

परी शिवनेत्रींचा प्रळयाग्नी । तेणें दाहिले होते पंचवाणी । परी तो गेला भक्षुनि । द्विमूर्धनी महाराज ॥ १०८ ॥

Transliteration

Paree Shiva-netreenchaa pralaya-agnee | Tene daahile hote Pancha-vaanee | Paree toh gelaa hota bhakshuni | Dvi-moordhanee Mahaaraaja ||

Ovee 109

तो शिवशरीरीं चेतला मदन । जठरीं वाहत होता द्विमूर्धन । तयामाजी जीवित्वप्राण । अंतरिक्ष संचरला ॥ १०९ ॥

Transliteration

Toh Shiva-shareeree chetalaa Madanu | Jatharee vaahata hotaa dvi-moordhanu | Tayaa-maajee jeevitva-praanu | Antariksha sancharalaa ||

Ovee 110

तो अंतरिक्ष महाराज । अग्नि जठरामाजी विराजे । तो गर्भ अति तेजःपुंज । यज्ञकुंडीं सांडिला ॥ ११० ॥

Transliteration

Toh Antariksha Mahaaraaju | Agni jatharaa-maajee viraaje | Toh garbha ati tejah-punju | Yajnya-kundee saandilaa ||

Ovee 111

पूर्ण होतांचि यज्ञआहुती । शेष प्रसाद मिरवूनी निगुती । मग यज्ञकुंडीं विप्राहुती । रक्षा काढी बृहद्रवा ॥ १११ ॥

Transliteration

Poorna hotaanchi yajnya-aahutee | Shesha prasaada miravuni nigutee | Maga yajnya-kundee vipra-aahutee | Rakshaa kaadhee Brihadravaa ||

Ovee 112

विप्राहातें सलील बाळतेजातें । रक्षा स्पर्शतां लागे हातें । दृष्टी पाहतां बाळातें । मंजुळवत रुदन करी ॥ ११२ ॥

Transliteration

Vipra-haate saleela baala-tejaate | Rakshaa sparshataa laage haate | Drishtee paahataa baalaate | Manjula-vata rudana karee ||

Ovee 113

तंव तो पुरोहित ज्ञानी द्विज । रायासी म्हणे महाराज । यज्ञकुंडीं तेजःपुंज । बाळ प्रसाद मिरविलें ॥ ११३ ॥

Transliteration

Tava toh purohita jnyaanee dviju | Raayaasee mhane Mahaaraaju | Yajnya-kundee tejapunju | Baala prasaada miravile ||

Ovee 114

प्रत्योदक उचलोनि हाती । बाळ दावी रायाप्रती । राव पाहोनि तेजस्थिती । परम चित्तीं तोषला ॥ ११४ ॥

Transliteration

Pratyodaka uchaloni haatee | Baala daavee raayaa-pratee | Raava paahoni teja-sthitee | Parama chittee toshalaa ||

Ovee 115

जैसा जलार्णव मंथन करितां । त्यांत चतुर्दश रत्नें निघतां । मग आनंद न माये सुरवरचित्ता । तैसें झालें बृहद्रव्या ॥ ११५ ॥

Transliteration

Jaisaa jala-arnava manthana karitaa | Tyaata chatur-dasha ratne nighataa | Maga aananda na maaye suravara-chittaa | Taise jhaale Brihadravyaasee ||

Ovee 116

कीं संजीवनींचा धरुनि अर्थ । कच गेला शुक्रगृहातें । साधूनि येतां संजीवनीतें । शचीनाथ आनंदला ॥ ११६ ॥

Transliteration

Kee sanjeevaneenchaa dharuni arthu | Kacha gelaa Shukra-grihaate | Saadhuuni yetaa sanjeevaneete | Shachee-Naatha aanandalaa ||

Ovee 117

कीं राम उपजतां कौसल्ये कुशीं । आनंद झाला दशरथासी । तेवीं पाहतां बाळमुखासी । बृहद्रवा आनंदला ॥ ११७ ॥

Transliteration

Kee Raama upajataa Kausalye kushee | Aananda jhaalaa Dasharathaasee | Tevee paahataa baala-mukhaasee | Brihadravaa aanandalaa ||

Ovee 118

मग पुरोहित विप्रपासून । निजकरीं कवळी अग्निनंदन । परम स्नेहें हृदयीं धरुन । घेत चुंबन बाळाचे ॥ ११८ ॥

Transliteration

Maga purohita vipra-paasunu | Nija-karee kavalee Agni-nandanu | Parama snehe hridayee dharunu | Gheta chumbana baalaache ||

Ovee 119

परम उदेला आनंद पोटीं । कीं चंद्रोदयींची ऐक्यभेटी । मग समुद्रपात्रा तोयदाटी । प्रेमलहरी उचंबळे ॥ ११९ ॥

Transliteration

Parama udelaa aananda potee | Kee chandra-udayeenchee aikya-bhetee | Maga samudra-paatraa toya-daatee | Prema-laharee uchambale ||

Ovee 120

वारंवार घेत चुंबन । कीं त्यातें भासे प्रत्यक्ष मदन । परी तो मदनचि व्यक्त पूर्ण । शिवकायेचा प्रगटला ॥ १२० ॥

Transliteration

Vaaramvaara gheta chumbanu | Kee tyaate bhaase pratyaksha madanu | Paree toh madanachi vyakta poornu | Shiva-kaayechaa pragatalaa ||

Ovee 121

कीं सत्वगुणी विद्युल्लता । पाळा मांडिला शरीरावरुता । कीं पुनर्विधु प्रसन्न होतां । तेज आपुलें अर्पिलें ॥ १२१ ॥

Transliteration

Kee satva-gunee vidyullataa | Paalaa maandilaa shareeraavarutaa | Kee punar-vidhu prasanna hotaa | Teja aapule arpile ||

Ovee 122

कीं संघांत अपार किरणीं । महीं मिरवला हा उत्तम तरणी । असो ऐसा अपार चिन्ही । वर्णिता ग्रंथ वाढेल ॥ १२२ ॥

Transliteration

Kee sanghaanta apaara kiranee | Mahee miravalaa haa uttama taranee | Aso aisaa apaara chinhee | Varnitaa grantha vaadhelu ||

Ovee 123

असो बृहद्रवा लवडसवडीं । अंतःपुरांत जात तांतडी । धर्मपत्नी संसारसांगडी । निजदृष्टीं विलोकी ॥ १२३ ॥

Transliteration

Aso Brihadravaa lavadasavadee | Anta-puraanta jaata taatadee | Dharma-patnee sansaara-saangadee | Nija-drishtee vilokee ||

Ovee 124

नाम तिचें सुलोचना । होय ती प्रत्यक्ष सुलोचना । शुभानना ती देवांगना । महीलागीं उतरली ॥ १२४ ॥

Transliteration

Naama tiche Sulochanaa | Hoya tee pratyaksha Sulochanaa | Shubha-aananaa tee deva-anganaa | Mahee-laagee utaralee ||

Ovee 125

कीं प्रत्यक्ष रमा सरस्वती । कीं दिव्य अपर्णेची मूर्ती । उदया आली मायभगवती । कुरुकुळातें तारावया ॥ १२५ ॥

Transliteration

Kee pratyaksha Ramaa Sarasvatee | Kee divya Aparnechee moortee | Udayaa aalee maaya-Bhagavatee | Kuru-kulaate taaraavayaa ||

Ovee 126

जिचे पाहतां चरण । गंगोदक दिसे मळिण । शंतनूसारखें टाकूनि रत्न । शिवमौळी विराजली ॥ १२६ ॥

Transliteration

Jiche paahataa charanu | Ganga-udaka dise malinu | Shantanoo-saarakhe taakuni ratnu | Shiva-maulee viraajalee ||

Ovee 127

तस्मात् गंगासमान हातीं । देतां अपूर्व लागे गोष्टी । असो तिनें बाळक देखतां दृष्टी । पुसे रायातें आवडीनें ॥ १२७ ॥

Transliteration

Tasmaatu Gangaa-samaana haatee | Detaa apoorva laage goshtee | Aso tine baalaka dekhataa drishtee | Puse raayaate aavadeene ||

Ovee 128

म्हणे महाराजा विजयध्वजा । करीं कवळिलें कवण आत्मजा । मातें भासें मित्रवोजा । दुसरा तरणी आहे हा ॥ १२८ ॥

Transliteration

Mhane Mahaaraajaa vijaya-dhvajaa | Karee kavalile kavana aatmajaa | Maate bhaase mitra-vojaa | Dusaraa taranee aahe haa ||

Ovee 129

येरु म्हणे वो शुभाननी । यज्ञकुंडाद्विमूर्धनी । प्रसादरुपें दिधलें तेणें । राजस्तंभीं मिरवावया ॥ १२९ ॥

Transliteration

Yeru mhane vo shubha-aananee | Yajnya-kunda-Dvi-moordhanee | Prasaada-rupe didhale tene | Raaja-stambhee miravaavayaa ||

Ovee 130

तव उदरी जो मीनकेत । मनानें वरीं आपुला सुत । तयावरील सकळ हेत । या बाळातें मिरवाया ॥ १३० ॥

Transliteration

Tava udaree jo Meenaketu | Manaane varee aapulaa sutu | Tayaavareela sakala hetu | Yaa baalaate miravaayaa ||

Ovee 131

तरी वशासी मीनकेत । दिव्यस्वरुपा आहे सुत । तयाचा पाठीराखा निश्चित । ईश्वरें हा प्रेरिला ॥ १३१ ॥

Transliteration

Taree vamshaasee Meenaketu | Divya-svarupaa aahe sutu | Tayaachaa paathee-raakhaa nishchitu | Eeshvare haa prerilaa ||

Ovee 132

अगे हा अयोनिसंभव जाण । अवतारदक्ष चिद्रत्न । ज्वाळाभाळी होऊनि प्रसन्न । प्रसाद दिधला आपणांसी ॥ १३२ ॥

Transliteration

Age haa ayoni-sambhava jaanu | Avataara-daksha chid-ratnu | Jvaalaa-bhaalee houni prasannu | Prasaada didhalaa aapanaansee ||

Ovee 133

ऐसें वदतां राजभूप । सुलोचना कवळी बाळकंदर्प । तयाचे पाहूनि दिव्यरुप । मोहदीप उजळला ॥ १३३ ॥

Transliteration

Aise vadataa raaja-bhoopu | Sulochanaa kavalee baala-Kandarpu | Tayaache pahuni divyarupu | Moha-deepa ujalalaa ||

Ovee 134

बाळ हृदयीं कवळूनि धरितां । पयोधरी लोटली पयसरिता । बाळमुखी स्तन घालितां । पयःपान स्वीकारी ॥ १३४ ॥

Transliteration

Baala hridayee kavaluni dharitaa | Payo-dharee lotalee paya-saritaa | Baala-mukhee stana ghaalitaa | Payahpaana sveekaaree ||

Ovee 135

मग उत्तम करी बाळरीती । स्नानमार्जनादि सारिती । यापरी द्वादश दिनांप्रती । परम सोहळा मांडियेला ॥ १३५ ॥

Transliteration

Maga uttama karee baala-reetee | Snaana-maarjanaadi saaritee | Yaaparee dvaadasha dinaam-pratee | Parama sohalaa maandiyelaa ||

Ovee 136

मेळवूनि सुवासिनी । पाळणा घातला योगप्राज्ञी । जालिंदर हें नाम जनीं । सकळा आवडीं ठेविलें ॥ १३६ ॥

Transliteration

Melavuni suvaasinee | Paalanaa ghaatalaa yoga-praajnyee | Jaalindara hey naama janee | Sakalaa aavadee thevile ||

Ovee 137

यज्ञकुंडींचा ज्वाळामाळी । प्रसन्न झाला तेणें काळीं । ज्वाळांत उदेला म्हणूनि सकळीं । नाम जालिंदर स्थापिले ॥ १३७ ॥

Transliteration

Yajnya-kundeenchaa jvaalaa-maalee | Prasanna jhaalaa tene kaalee | Jvaalaanta udelaa mhanuni sakalee | Naama Jaalindara sthaapile ||

Ovee 138

ऐशा करुनियां गजरा । ग्रामांत वाटिली गोड शर्करा । अपार धन याचक नरां । लौकिकार्थ वांटिले ॥ १३८ ॥

Transliteration

Aishaa karuniyaa gajaraa | Graamaanta vaatilee goda sharkaraa | Apaara dhana yaachaka naraa | Laukika-artha vaantile ||

Ovee 139

ऐशिया गजरें पूर्ण राहटी । झाली बहुत दिवसां लोटी । मास संवत्सर पंचवटी । षट् सप्तम लोटले ॥ १३९ ॥

Transliteration

Aishiyaa gajare poorna raahatee | Jhaalee bahuta divasaa lotee | Maasa samvatsara pancha-vatee | Shatu saptama lotale ||

Ovee 140

यापरी तो बृहद्रवा राणा । अपार पाळिल्या ललना । पुढें योजूनि मौंजीबंधना । यज्ञोपवीत आराधी ॥ १४० ॥

Transliteration

Yaaparee toh Brihadravaa raanaa | Apaara paalilyaa lalanaa | Pudhe yojuni maunjee-bandhanaa | Yajnya-upaveeta aaraadhee ||

Ovee 141

याउपरी कोणे एके दिवसी । राव विचार करी मानसीं । गृहस्थाश्रमी जालिंदरासी । लग्नविधी उरकाया ॥ १४१ ॥

Transliteration

Yaauparee kone eke divasee | Raava vichaara karee maanasee | Grihastha-ashramee Jaalindaraasee | Lagna-Vidhee urakaayaa ||

Ovee 142

म्हणवूनि आपला पुरोहित । मंत्रि सवें देऊनि त्यातें । उत्तम कुमारी शोधार्थ । महीवरी प्रेरिला ॥ १४२ ॥

Transliteration

Mhanavuni aapalaa purohitu | Mantri save deuuni tyaate | Uttama kumaaree shodha-arthu | Mahee-varee prerilaa ||

Ovee 143

गुणवंत रुपवंत । सुलक्षणी कुमारी पाहत । मंत्री आणि पुरोहित । देशावरी हिंडती ते ॥ १४३ ॥

Transliteration

Gunavanta rupavantu | Sulakshanee kumaaree paahatu | Mantree aani purohitu | Deshaa-varee hindatee tey ||

Ovee 144

येरीकडे जालिंदर । राजांगना परम सुंदर । घेऊनिया अंकावर । चुंबन घेती लालसें ॥ १४४ ॥

Transliteration

Yereekade Jaalindaru | Raaja-anganaa parama sundaru | Ghevuniyaa ankaavaru | Chumbana ghetee laalase ||

Ovee 145

परम स्नेहानें ऊर्ध्वदृष्टी । पाहूनि बोले योगजेठी । धूर्मिण मंत्री मम दृष्टीं । दिसत नाहीं कां माते ॥ १४५ ॥

Transliteration

Parama snehaane oordhva-drishtee | Pahuni bole Yoga-jethee | Dhoormina mantree mama drishtee | Disata naahee kaa maate ||

Ovee 146

येरी म्हणे पाडसा ऐके । तुज स्त्री करावया जनकें । पुरोहित आणि मंत्री देखें । पाठविले आहेत बा ॥ १४६ ॥

Transliteration

Yeree mhane paadasaa aike | Tuja stree karaavayaa janake | Purohita aani mantree dekhe | Paathavile aaheta baa ||

Ovee 147

येरी म्हणे स्त्री काये । माता म्हणे बायकोसी म्हणावें । येरु म्हणे मज दावावें । बायका कैशा जननीये ॥ १४७ ॥

Transliteration

Yeree mhane stree kaaye | Maataa mhane baayakosee mhanaave | Yeru mhane maja daavaave | Baayakaa kaishaa jananeeye ||

Ovee 148

येरी म्हणे मजसमान । बायको येईल तुजकारण । जैसी मी बा त्याचसमान । तुज बायको येईल कीं ॥ १४८ ॥

Transliteration

Yeree mhane maja-samaanu | Baayako yaeela tuja-kaaranu | Jaisee mee baa tyaacha-samaanu | Tuja baayako yaeela kee ||

Ovee 149

ऐसी सुलोचना त्यातें वदतां । तो शब्द रक्षूनि आपुल्या चित्ता । बाळांत येऊनि खेळतां खेळतां । बाळांलागीं पुसतसे ॥ १४९ ॥

Transliteration

Aisee Sulochanaa tyaate vadataa | Toh shabda rakshuni aapulyaa chittaa | Baalaanta yeuuni khelataa khelataa | Baalaa-laagee pusatase ||

Ovee 150

म्हणे गडे हो ऐका एकु । मम तात माता करिती बायकु । तीस कासयासाठीं अर्थकौतुकु । करितां बायकु तें सांगा ॥ १५० ॥

Transliteration

Mhane gade ho aikaa eku | Mama taata maataa karitee baayaku | Teesa kaasayaa-saathee artha-kautuku | Karitaa baayaku tey saangaa ||

Ovee 151

तंव ते बोलती विचक्षण । बहु शठपणीं बोलती हांसून । जालिंदर बुद्धिहीन । बायकोही कळेना ॥ १५१ ॥

Transliteration

Tava tey bolatee vichakshanu | Bahu shatha-panee bolatee hasuni | Jaalindara buddhi-heenu | Baayakohee kalenaa ||

Ovee 152

मग ते म्हणती मूर्खा ऐक । बायकु म्हणतां संसार निक । विषयसुखाचें पूर्ण भातुक । जगामाजी मिरवीतसे ॥ १५२ ॥

Transliteration

Maga tey mhanatee moorkhaa aiku | Baayaku mhanataa samsaara niku | Vishaya-sukhaache poorna bhaatuku | Jagaa-maajee miraveetase ||

Ovee 153

विषयसुख म्हणजे काई । सांगती न ठेवता गोबाई । ते ऐकूनि थरारुन जाई । मनीं विचार करीतसे ॥ १५३ ॥

Transliteration

Vishaya-sukha mhanaje kaaee | Saangatee na thevataa gobaaee | Tey aikuni tharaaruna jaaee | Manee vichaara kareetase ||

Ovee 154

अगा जग हें परम अधम । आचरण आचरती परम दुर्गम । जें कां जगाचें उत्पत्तिस्थान । तेचि रमणी रमतात ॥ १५४ ॥

Transliteration

Agaa jaga hey parama adhamu | Aacharana aacharatee parama durgamu | Je kaa jagaache utpatti-sthaanu | Techi ramanee ramataatu ||

Ovee 155

तरी आपण करुं नये ऐसें । याचा मनाला सबळ त्रास । ऐसें रचुनि विवेकास । मुलांतूनि निघाला ॥ १५५ ॥

Transliteration

Taree aapana karu naye aise | Yaachaa manaalaa sabala traasu | Aise rachuni vivekaasu | Mulaantuni nighaalaa ||

// singer missed this //

Ovee 156

मनांत अति करी विचार । मातेच्या शब्दासी पर । तरी ते ते करुनि वेव्हार । अधर्मराशी दिसतसे ॥ १५६ ॥

Transliteration

Manaanta ati karee vichaaru | Maate-chyaa shabdaasee paru | Taree tey tey karuni vevhaaru | Adharma-raashee disatase ||

Ovee 157

माता बोलली मजसमान । कांता मिरवतसे चिद्रत्न । तरी ती कांता मज मातेसमान । वेव्हारा योग्य वाटेना ॥ १५७ ॥

Transliteration

Maataa bolalee maja-samaanu | Kaantaa miravatase chid-ratnu | Taree tee kaantaa maja maate-samaanu | Vevhaaraa yogya vaatenaa ||

Ovee 158

तरीही पूर्ण अधर्मराशी । कदा न वर्तू कार्यासी । मग सांडूनि ग्रामधामदारासी । काननांतरीं निघाला ॥ १५८ ॥

Transliteration

Tareehee poorna adharma-raashee | Kadaa na vartoo kaaryaasee | Maga saanduni graama-dhaama-daaraasee | Kaananantaree nighaalaa ||

Ovee 159

परी ग्रामद्वारीं ग्रामरक्षक । त्यांनीं जातां पाहिलें बाळक । परी राजनंदन म्हणूनि धाक । हटकावया अंतरले ॥ १५९ ॥

Transliteration

Paree graama-dvaaree graama-rakshaku | Tyaannee jaataa paahile baalaku | Paree raaja-nandana mhanuuni dhaaku | Hatakaavayaa antarale ||

Ovee 160

परी बुद्धीचा त्यांनी विवेक केला । हेर मागें पाठविला । कोणी जाऊनि त्वरें नृपाला । सांगताती तांतडीनें ॥ १६० ॥

Transliteration

Paree buddheechaa tyaannee viveka kelaa | Hera maage paathavilaa | Konee jauni tvare nripaalaa | Saangataatee taantadeene ||

Ovee 161

हे महाराज भुवननाथ । विपिनीं गेला आपुला सुत । रायें ऐसा ऐकूनि वृत्तांत । आला धांवत तांतडीने ॥ १६१ ॥

Transliteration

Hey Mahaaraaja bhuvana-Naathu | Vipinee gelaa aapulaa sutu | Raaye aisaa aikuni vrittaantu | Aalaa dhaavata taantadeene ||

Ovee 162

परी तो चपळ विलक्षण । म्हणे कोणी येईल धांवोन । म्हणोनि मार्गातें सोडोन । महाकाननीं रिघाला ॥ १६२ ॥

Transliteration

Paree toh chapala vilakshanu | Mhane konee yaeela dhaavonu | Mhanoni maargaate sodonu | Mahaa-kaananee righaalaa ||

Ovee 163

तंव त्या विपिनीं तरुदाटी । विशाळ जाळिया तृण अफाटी । त्यांत संचरतां हेर दृष्टी । चुकुर झाले पाहतां ॥ १६३ ॥

Transliteration

Tava tyaa vipinee taru-daatee | Vishaala jaaliyaa trina aphaatee | Tyaata sancharataa hera drishtee | Chukura jhaale paahataa ||

Ovee 164

परी तो योगेंद्र वपळ बहुत । जातां जातां एक पर्वत । त्याची दरी धरुनि सुत । उत्तरदिशे चालिला ॥ १६४ ॥

Transliteration

Paree toh Yogendra vapala bahutu | Jaataa jaataa eka parvatu | Tyaachee daree dharuni sutu | Uttara-dishe chaalilaa ||

Ovee 165

येरीकडे नृपनाथ । काननीं निघाला शोध करीत । परी शोध लागला दूतस्थानापर्यंत । पुढें शोध लागेना ॥ १६५ ॥

Transliteration

Yereekade nripa-Naathu | Kaananee nighaalaa shodha kareetu | Paree shodha laagalaa doota-sthaanaa-paryantu | Pudhe shodha laagenaa ||

Ovee 166

पाहतां परी बहु विपिन । परी जालिंदराचें न पावें दर्शन । जैसा अमावास्येचा दिन । चंद्रमणी लोपतसे ॥ १६६ ॥

Transliteration

Paahataa paree bahu vipinu | Paree Jaalindaraache na paave darshanu | Jaisaa amaavaasyechaa dinu | Chandra-manee lopatase ||

Ovee 167

ऐसें झालें सकळांसी । निराशपणें ग्रामासी । येते झाले झालिया निशी । शोक करितां सकळांनीं ॥ १६७ ॥

Transliteration

Aise jhaale sakalaansee | Niraasha-pane graamaasee | Yete jhaale jhaaliyaa nishee | Shoka karitaa sakalaannee ||

Ovee 168

रायासह अपार जन । पाहती आपुलालें सदन । परी बृहद्रवा आणि सुलोचना । परम अट्टहास करिताती ॥ १६८ ॥

Transliteration

Raayaa-saha apaara janu | Paahatee aapulaale sadanu | Paree Brihadravaa aani Sulochanaa | Parama attahaasa karitaatee ||

Ovee 169

बाळलीला खेळ अद्भुत । आठवोनि गातां रुदन करीत । राव म्हणे हा अनुचित । प्रसाद हातींचा पै गेला ॥ १६९ ॥

Transliteration

Baala-leelaa khela adbhutu | Aathavoni gaataa rudana kareetu | Raava mhane haa anuchitu | Prasaada haateenchaa pai gelaa ||

Ovee 170

मातें अग्नि झाला प्रसन्न । अहा माझें कर्म गहन । हातींचे गेले चिद्रत्न । काय करुं उपाय हो ॥ १७० ॥

Transliteration

Maate Agni jhaalaa prasannu | Ahaa maajhe karma gahanu | Haateenche gele chidratnu | Kaaya karu upaaya ho ||

Ovee 171

अहा बाळक माझें अर्कासमान । तेजरुप वाटे मदन । माता म्हणे खेळ उत्तम । काय वर्णू तयाचा ॥ १७१ ॥

Transliteration

Ahaa baalaka maajhe arka-samaanu | Teja-rupa vaate Madanu | Maataa mhane khela uttamu | Kaaya varnu tayaachaa ||

Ovee 172

ऐसा करितां अट्टहास । परी आणिक सरदार बुद्धिलेश । रायास सदा बोधी नानाभाष्य । युक्तिप्रयुक्ती करोनियां ॥ १७२ ॥

Transliteration

Aisaa karitaa attahaasu | Paree aanika saradaara buddhi-leshu | Raayaasa sadaa bodhee naanaa-bhaashyu | Yukti-prayuktee karoniyaa ||

Ovee 173

म्हणती राया नरोत्तमा । जालिंदर अयोनिसंभव । तरी हा सेवितां महाकानन । त्यासीं मरण नसेचि ॥ १७३ ॥

Transliteration

Mhanatee raayaa narottamaa | Jaalindara ayoni-sambhavu | Taree haa sevitaa mahaa-kaananu | Tyaasee marana nasechi ||

Ovee 174

मही समुद्रवलयांकित । शोध करु आम्ही निश्चित । परी केव्हांतरी तरी तुमचा सुत । तुम्हां भेटेल महाराजा ॥ १७४ ॥

Transliteration

Mahee samudra-valayaankitu | Shodha karu aamhee nishchitu | Paree kevhaantaree tumachaa sutu | Tumhaa bhetela Mahaaraajaa ||

Ovee 175

तरी निःसंशयेंकरुन । धैर्यअर्गळी ठेवा मन । ऐशा युक्तकरुन । रायासी शांत करिताती ॥ १७५ ॥

Transliteration

Taree nisangshaye-karuni | Dhairya-argalee thevaa manu | Aishaa yukta-karuni | Raayaasee shaanta karitaatee ||

Ovee 176

येरीकडे जालिंदर । पर्वतदरी अतिगुहार । संचरला परी महीवर । काळोखी रात्र दाटली ॥ १७६ ॥

Transliteration

Yereekade Jaalindaru | Parvata-daree atiguhaaru | Sancharalaa paree maheevaru | Kaalokhee raatra daatalee ||

Ovee 177

तयामाजी झालें विपरित । विपिनी वणवा लागला बहुत । पुढें तें कानन अग्नि जाळीत । तयापासीं पातला ॥ १७७ ॥

Transliteration

Tayaa-maajee jhaale viparitu | Vipinee vanavaa laagalaa bahutu | Pudhe tey kaanana Agni jaaleetu | Tayaapaasee paatalaa ||

Ovee 178

तंव त्या दरींत जालिंदर । निद्रे व्यापिला तृण अपार । तों जवळी आला वैश्वानर । तृण भक्षावया कारणें ॥ १७८ ॥

Transliteration

Tava tyaa dareenta Jaalindaru | Nidre vyaapilaa trina apaaru | Toh javalee aalaa Vaishvaanaru | Trina bhakshaavayaa kaarane ||

Ovee 179

तों बाळ गोमटें देखिले दृष्टीं । विस्मयो करी आपुले पोटीं । हे बाळ मम उदरजेठीं । उदय पावलें होतें कीं ॥ १७९ ॥

Transliteration

Toh baala gomate dekhile drishtee | Vismayo karee aapule potee | Hey baala mama udara-jethee | Udaya paavale hote kee ||

Ovee 180

उत्तम ठाव पाहूनि यातें । सांडिलें होतें म्यां गर्भातें । येथे यावया कारण यातें । कां पडलें न कळे हो ॥ १८० ॥

Transliteration

Uttama thaava pahuni yaate | Saandile hote myaa garbhaate | Yethe yaavayaa kaarana yaate | Kaa padale na kale ho ||

Ovee 181

मग शांत होऊनि मूर्तिमंत । बाळ त्वरें केला जागृत । अंकी घेऊनि पुसे त्यातें । कारण काय येथे यावया ॥ १८१ ॥

Transliteration

Maga shaanta houni moortimantu | Baala tvare kelaa jaagritu | Ankee ghevuni puse tyaate | Kaarana kaaya yethe yaavayaa ||

Ovee 182

येरु पाहूनि तया आदरें । म्हणे कोण तुम्ही सांगा सत्वर । येरु म्हणे मी वैश्वानर । जननीजनक तुझा मी ॥ १८२ ॥

Transliteration

Yeru paahuuni tayaa aadare | Mhane kona tumhee saangaa satvaru | Yeru mhane mee Vaishvaanaru | Jananee-janaka tujhaa mee ||

Ovee 183

येरु म्हणे जननीजनक । कैसे होतील हरएक । मग तो मुळींहूनि कथा पावक । तयालागीं सांगतसे ॥ १८३ ॥

Transliteration

Yeru mhane jananee-janaku | Kaise hoteela haraeku | Maga toh muleenhuni kathaa paavaku | Tayaa-laagee saangatase ||

Ovee 184

असो आतां वैश्वानर । पुढें पुढती लिहितां पर । ती कथा पुढें धुंडीकुमार । मालू नरहरीचा सांगे की ॥ १८४ ॥

Transliteration

Aso aataa Vaishvaanaru | Pudhe pudhatee lihitaa paru | Tee kathaa pudhe Dhundee-Kumaaru | Maaloo Narahareechaa saange kee ||

Ovee 185

स्वस्ति श्रीभक्तिकथासार । संमत गोरक्षकाव्य किमयागार । सदा परिसोत भाविक चतुर । एकादशाध्याय गोड हा ॥ १८५ ॥

Transliteration

Svasti Shreebhaktikathaa Saaru | Sammata Goraksha-Kaavya-Kimayaa gaaru | Sadaa parisota bhaavika chaturu | Ekaadasha Adhyaaya goda haa ||

श्रीकृष्णार्पणमस्तु । श्रीदत्तात्रेयार्पणमस्तु ।

Shri Krishnarpanamastu | Shri Dattatreyarpanamastu

इति श्रीनवनाथभक्तिसार एकादशाध्याय संपूर्ण ।

Iti Shri Navnath Bhaktisar Adhyaya Ekadasha Sampurnah